
शब्द रुप आले
मुक्या भावनांना.....
सौ वृषाली हणमंते गांगल

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# शब्दरूप आले मुक्या भावनांना

(लघुकथा संग्रह)

सौ वृषाली हणमंते गांगल

लेखिका: सौ वृषाली हणमंते गांगल.
एम कॉम, एम एम एस फायनान्स, बी एड.
सर्टिफाईड डिजिटल मार्केटिंग कन्सलटन्ट
बी 101 वेदा अलंबिक टीपी
13 छाननी कॅनल रोड, छाननी
वडोदरा गुजरात.
मोबाइल 9082007841
ई मेल vrushali.hg@gmail.com
Facebook page-
https://www.facebook.com/share/1631jraWiK/?mibextid=qi2Omg

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक:
ई साहित्य प्रतिष्ठान,
ईलेवन्थ फ़्लोअर, ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २३ मार्च २०२५
©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

•हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिका परिचय



**सौ वृषाली हणमंते गांगल**.

एम कॉम, एम एम एस फायनान्स,

बी एड.

सर्टिफाईड डिजिटल मार्केटिंग कन्सलटन्ट.

सौ. वृषाली हणमंते गांगल हे समकालीन साहित्य विश्वात आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत असलेले नाव आहे. लेखनामध्ये आधुनिकता असूनही पारंपारिक साहित्यिक मूल्यांची खोली स्पष्टपणे जाणवते. व पु काळे, सुरेश वैद्य, वैजयंती काळे हे अतिशय आवडते लेखक आहे. साहित्य प्रवासाची सुरुवात कॉलेजमध्ये असतानाच अनेक मासिके व वृत्तपत्रे यांच्यातून झाली. मासिके, वृत्तपत्रे यामध्ये अनेक कविता व लेख छापून आलेले आहे. आता सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाइन लेखन चालू आहे.स्वतःचे फेसबुक पेज शब्दशिल्प या नावाने चालू आहे.अनेक लेख डिजिटल स्वरूपात प्रसिद्ध होत आहेत. या पहिल्या कथासंग्रहानंतर आगामी ड्रीम प्रोजेक्टमध्ये विविध विषयांवर कथासंग्रह व कादंबरी लिहिण्याचा मानस आहे.

सौ वृषाली यांचे नवीन साहित्य तुम्ही नियमितपणे त्यांच्या फ़ेसबुकपेजवर वाचून त्यावर अभिप्राय द्यावा.

https://www.facebook.com/share/1631jraWiK/?mibextid=qi2Omg

**मनोगत**

आयुष्य म्हणजे भावनांचा संगम. प्रत्येक नातं, प्रत्येक प्रेमकहाणी वेगळी असते—कधी आनंदाची, कधी संघर्षांची, तर कधी हृदयस्पर्शी क्षणांनी भरलेली. प्रेमाच्या या विविध छटांना शब्दरूप देण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न, आणि तो तुमच्या हाती सोपवताना मनात एक अनोखी उत्सुकता आणि समाधान आहे.

या पुस्तकातील प्रत्येक कथा वेगळी आहे—कुणासाठी नवी सुरुवात, कुणासाठी आठवणींचा दरवाजा, तर कुणासाठी नात्याचा नवा अर्थ. प्रेम म्हणजे केवळ गुलाब आणि भेटवस्तू नाही, तर त्यात वेदना, समजूतदारपणा आणि निस्वार्थी भावना यांचाही समावेश असतो. या कथांमधून मी हेच दर्शवण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखन हा माझ्यासाठी केवळ एक छंद नव्हे, तर आत्मसंवाद आहे. पहिल्यांदाच माझ्या भावना, विचार आणि पात्रांची कहाणी तुम्हापर्यंत पोहोचवताना मी अत्यंत आनंदी आणि थोडी उत्कंठित देखील आहे. वाचक म्हणून तुम्ही या कथा अनुभवताना त्या पात्रांशी, त्यांच्या भावनांशी जोडले जाल, अशी आशा आहे.

या प्रवासात माझ्या आईचा, जोडीदाराचा, कुटुंबाचा, मित्रपरिवाराचा आणि वाचकांचा मला जो पाठिंबा लाभला, त्याबद्दल मी मनःपूर्वक आभार मानते. मला लेखनाचा वारसा आणि प्रेरणा माझ्या आईकडून (अमिता हणमंते ) मिळाली आणि माझा हा पहिला प्रयत्न तिला समर्पित...

हे पुस्तक तुमच्या हृदयाला स्पर्श करो, तुमच्या आठवणींना उजाळा देवो, हीच इच्छा!

सौ. वृषाली हणमंते गांगल.

# अर्पणपत्रिका

प्रेम, ओढ, आशा, आणि मानवी भावनांच्या असंख्य छटांना स्पर्शणाऱ्या

या लघुकथासंग्रहाचे अर्पण...

**त्या अव्यक्त भावनांना,

त्या न बोलता उमलणाऱ्या आठवणींना,

त्या चुकलेल्या वाटांना आणि नव्याने सापडलेल्या दिशांना…**

माझे प्रिय आई वडील अनिल हणमंते व अमिता हणमंते .

माहेर व सासरचे सर्व कुटुंब ज्यांची या प्रवासात मला साथ आहे

आणि सर्व वाचकांना,

जे शब्दांच्या या प्रवासात सोबत आहेत,

जे प्रत्येक कथेत स्वतःला शोधतात,

आणि जे एका नव्या दृष्टीकोनाने जीवनाकडे पाहण्याची प्रेरणा घेतात.

**— सौ. वृषाली हणमंते गांगल**

# कथानुक्रम

अपूर्ण मी तुझ्याविना

सावळ्याची जणू सावली

अवचित होता भेट तुझी

चंद्र आहे साक्षीला

बाते कुछ अनकही सी

मन धागा धागा जोडते नवा...

माझीया प्रियाला प्रित कळेना...

बंदिशाळा

सूर्योदय प्रेमाचा

शब्दांचे ओझे

ओढ तुझी

उसवले धागे कसे कधी

आई... थांब ना ग तू

आठवणींचा अल्बम

नसतोस घरी तू जेव्हा ..

**थेंब थेंब शब्द सांडत गेले,**

**कथा मनाच्या उमलत गेल्या।**

**कधी हास्य, कधी आसवे आली,**

**जीवनाच्या गूढ वाटा सांगत गेल्या..**

---सौ वृषाली हणमंते गांगल.

# अपूर्ण मी तुझ्याविना..




रोजच्या सारखेच ऑफिस मधून परतताना सृष्टीने सवयीप्रमाणे इयरफोन कानात अडकवले आणि सर्वांना बाय करून ती निघाली. घरी पोहोचताच तिने फ्रेश होऊन चहा घेता घेता लॅपटॉप उघडला आणि मेल चेक करू लागली ... एका मेलवर तिची नजर थांबली आणि तिचे मन भूतकाळात गेले. आकाश... तो सृष्टीच्या आयुष्यात आला एका वादळासारखा..! आणि तितक्याच शांतपणे निघूनही गेला.. त्यांना पहिल्यांदा भेटून आता चार वर्षे होऊन गेली होती पण ती भेट तिच्या मनात अजून ताजी होती. पहिल्यांदा ती दोघं भेटली तेव्हा दोघेही करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यात होते .आकाशला त्याच्या स्वप्नांच्या मागे धावायचं होतं ,जगभर फिरायचं होतं आणि सृष्टीला तीच स्थिर शांत जीवन हवं होतं. या दोन भिन्न विचारधारा असूनही त्यांचे प्रेम एकमेकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनल होत. या प्रेमात एक विलक्षण उब होती... जिथे शब्दांच्या पलीकडे भावना अधिक प्रखर होत होत्या.

पण ...काही काळानंतर आकाशने त्याच्या स्वप्नांसाठी परदेशात जाऊन स्थायिक होण्याचा निर्णय घेतला , सृष्टीला हे मान्य नव्हतं .. तिला आकाशची सोबत हवी होती पण त्याचबरोबर तिला त्याच स्वातंत्र्य ही कळत होतं .शेवटी त्यांनी निर्णय घेतला की काही काळ ते एकमेकांपासून दूर राहतील ...त्यांच्या आयुष्यात काय महत्त्वाच आहे हे समजून घेण्यासाठी. त्या निर्णयानंतर आकाश परदेशात गेला आणि सृष्टीला तिचं जीवन थांबल्यासारख वाटू लागलं. सुरुवातीला दोघांनी आवर्जून संपर्कात राहण्याचा प्रयत्न केला पण आकाश त्याच्या कामात, स्वप्नात हरवून जाऊ लागला. संवाद कमी होत गेला. एक दिवस आकाशने मेसेज पाठवला... आपण दोघेही वेगळ्या वाटांवर चाललो आहोत .तुझ स्थिर आयुष्य आणि माझं स्वप्नांच जगणं दोन्ही एकमेकांसोबत राहू शकत नाही. आपण आपापल्या मार्गाने पुढे जावं... सृष्टीच मन सुन्न झाल. त्याच्या वाचून ती स्वतःला अपूर्ण समजू लागली . तिच्या मनात एकटेपण भरून राहिलं होतं .ती त्याच्या आठवणीत अडकून पडली होती. दिवसेंदिवस त्याच्या आठवणी तिच्या मनात गडद होत चालल्या होत्या. प्रत्येक कोपऱ्यात, प्रत्येक क्षणात , प्रत्येक गोष्टीत ती त्याची सावली शोधत होती. वर्ष लोटली पण सृष्टी त्यातून बाहेर येऊ शकली नाही. कामाच्या व्यस्ततेत स्वतःला हरवून टाकण्यासाठी नोकरी सुरू केली मित्र-मैत्रिणींमध्ये रमण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बाकी आयुष्य कितीही सुंदर असलं तरी काहीतरी सतत हरवल्यासारखं वाटत होतं .ती आकाशचीच कमतरता होती, ज्याच्यामुळे तिचं मन सतत बेचैन होतं. मी त्याच्याशिवाय अपूर्ण आहे हा विचार तिच्या मनात खोलवर रुजला होता . ..आणि आज हा मेल ..!

तो मेल आकाशचाच होता . त्याच्या जगात त्याने खूप काही साध्य केलं होतं, आणि तो आता भारतात परतणार होता. त्याने सृष्टीला भेटायचं निमंत्रण दिलं

होतं. तिच्या मनात परत एकदा उलथापालथ झाली. भेटावं की न भेटावं...? या विचारात ती गुरफटली. शेवटी तिने निर्णय घेतला ती भेटणार... तिला कळलं होतं कि ती या अपूर्णतेला कायमचं सोडवू इच्छिते, मग त्याच्या शेवट काहीही असो. ज्या ठिकाणी ते पहिल्यांदा भेटले होते त्या कॅफेमध्ये त्यांनी भेटायचं ठरवलं . सृष्टी तिथे पोहोचली. तीच हृदय जोरजोरात धडधडू लागलं. काही क्षणांनी आकाश समोरून चालत येताना दिसला ,तो थोडा बदललला होता पण त्याचा रुबाबदारपणा आजही तसाच होता. तिच्या सतत आठवणीत असणारा आकाश आज प्रत्यक्षात तिच्यासमोर होता. ते दोघेही काही क्षण एकमेकांकडे पाहतच राहिले ,मग सृष्टीने हळूच हसत विचारले ..कसा आहेस?

" मी ठीक आहे" आकाश म्हणाला. त्याच्या आवाजात एक हळवी भावना होती. दोघांनी खूप वेळ बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्यातल्या अंतरामुळे शब्द कमी आणि मौन जास्त होतं. अखेरीस आकाशने सांगितलं ..."मी आजही माझ्या स्वप्नांच्या मागे धावतोय पण तुझी आठवण कधीच गेली नाही .मी ज्या जीवनाची निवड केली होती त्यात सर्व काही आहे पण तू ,तुझं प्रेम नाही . त्यामुळे मला माझ आयुष्य अपूर्ण वाटतं. तुझ्याशिवाय माझं काही भविष्य नाही..!" हे ऐकून सृष्टीला खूप आनंद झाला .तिने आकाशला घट्ट मिठी मारली आणि म्हणाली गेल्या चार वर्षांपासून मीही असंच अपूर्ण तेच आयुष्य जगते आहे. आज आपण दोघेही पूर्ण झालो. त्या संध्याकाळी दोघेही पुन्हा एकत्र झाले. आता आकाशने हे मान्य केलं होतं की आयुष्यात कितीही यश , प्रसिद्धी, भौतिक सुख मिळालं तरीही प्रेम नसेल तर आपल आयुष्य अपूर्ण असतं..! जोडीदाराच्या प्रेमामुळेच आपण खऱ्या अर्थाने जीवन जगायला शिकतो... आणि आपल आयुष्य पूर्ण होतं..!

# सावळ्याची जणू सावली..

आज प्रीती घरात एकटीच होती. दुपारपर्यंत सगळी कामे आवरून ती शांतपणे तिच्या आवडत्या बाल्कनीतल्या खुर्चीत बसली होती. तिच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं होतं. आज पुन्हा सर्व काही नेहमी सारख होणार या विचाराने तिचं मन खट्टू झालं होतं. वयाच्या तिसाव्या वर्षी तिच्या लग्नाच्या चर्चा जोरात सुरू होत्या, पण दरवेळी काहीतरी कारणाने गोष्टी फिस्कटत होत्या.

प्रीती सुंदर होती, आत्मविश्वासू होती, स्वतःच्या पायावर उभी होती. तिचं शिक्षण चांगलं होतं, नोकरीही स्थिर होती, पण एक गोष्ट होती ज्यामुळे तिच्या वाट्याला वारंवार नकार येत होते – तिचा सावळा रंग.

अगदी सुरुवातीपासूनच तिने असे अनेक अनुभव घेतले होते की तीच अस्तित्व हे फक्त तिच्या सावळया रंगापाशी येऊन थांबलं होतं. आजही जेव्हा कुणी तिच्याशी बोलायला यायचं, तेव्हा सुरुवातीच्या बोलण्यातच तिच्या रंगावरून काही ना काही टिपण्णी व्हायची.

दोन महिन्यांपूर्वीच एका स्थळानं तिचा फोटो पाहून पसंत केलं होतं. घरच्यांनी सर्व माहिती दिली होती, दोन्ही बाजूंनी सगळं जमेल असं वाटत होतं. पण प्रत्यक्ष भेटीनंतर मुलाच्या आईने "मुलगी सुंदर आहे, पण रंग..." असं म्हणत बोलणी

बंद केली. तेव्हा प्रीतीच  मन ढवळून निघालं होतं. त्यानंतर तिला हे लग्नाचे विचारही नकोसे वाटले वाटू लागले.

आज पुन्हा तसाच काहीसा प्रसंग आला होता. तिच्या आईने शांतपणे तिला आम्ही बाहेर जाऊन येतो संध्याकाळी मुलाकडचे बघायला येणार आहेत तेव्हा तयार रहा असे सांगितले होते. ती कितीही नाही म्हणत असताना लग्न करणे किती आवश्यक आहे यावर आई-बाबांनी तिची समजूत घातली होती आणि तिला त्यांनी त्या मुलाला भेटण्यास तयार केले होते.

प्रीतीच्या डोळ्यांमध्ये अस्वस्थता स्पष्ट होती, पण ती काही बोलली नाही. वारंवार तिच्या मनात  विचार येत होते ‘माझ्या कर्तृत्वाचा, स्वभावाचा विचार न करता रंगावरूनच जर कोणी मला नाकारणार असेल तर अशा लोकांना मी का भेटावं? ह्या जगात रंगा शिवाय बाकी कशाचीच किंमत नाही का?

घराची बेल वाजल्याने तिची तंद्री तुटली .आई वडील सर्व खरेदी करून आणि अनेकविध पदार्थ घेऊन आले होते. आईने तिला पुन्हा एकदा तयार होण्यास सांगितले .उदास मनाने प्रीती आईसाठी तयारीला लागली.

दोन तासांनी मुलाचे आई-वडील आले, पण मुलगा मात्र एका महत्वाच्या मीटिंगमुळे थोडं उशिरा येणार होता. प्रीतीने सगळ्यांना चहा दिला आणि हळूहळू चर्चा सुरू झाली. आई-वडील अगदी सामान्य आणि सौम्य वाटत होते, पण त्यांच्या बोलण्यातही त्या प्रश्नाची सावली जाणवली.

तितक्यात दरवाज्याची बेल वाजली. मुलगा आलाय असं समजून प्रीती दरवाजा उघडायला गेली. समोर एक साधारण बांधा असलेला, साधा-सरळ दिसणारा मुलगा उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास होताच, पण

त्याचवेळी काहीसं साधेपणही होतं. त्याने हात पुढे करत ओळख करून दिली, “मी आदित्य. माफ करा, उशीर झाला.”

प्रीतीने नम्रपणे त्याला आत बोलावलं. काही क्षण सर्व शांत होते, तेव्हा आदित्यने बोलायला सुरुवात केली, “माझ्या आई-वडिलांना तुम्ही आवडलात की नाही मला माहित नाही प्रीती, पण एक गोष्ट स्पष्ट सांगतो – मला कधीच रंग, उंची, वजन यावरून माणसं जज करायची सवय नाही. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचं वजन मला महत्वाचं आहे.”

प्रीती थोडी थक्क झाली. इतक्या वर्षांच्या वेदना जणू त्या शब्दांत विरघ विरघळून गेल्या. आदित्यचं बोलणं साधं होतं, पण त्यात प्रामाणिकपणा होता.

त्या दिवशी त्यांच्या भेटीतला पहिला संवाद सहजसुंदर होता. प्रीतीच्या मनावरचा रंगाचा न्यूनगंड काहीसा हलका झाला होता. आदित्यसारख्या विचारांच्या व्यक्तीला भेटल्यामुळे तिच्या मनात आशेचा नवीन किरण निर्माण झाला. काही भेटीनंतर कितीतरी वर्षांनी प्रीती पुन्हा एकदा मनात नवीन स्वप्न फुलवू लागली.काही आठवड्यांनी प्रीती आणि आदित्यचं लग्न ठरलं. सगळ्या प्रथा-परंपरा पार पडल्या, लग्नाला आलेल्या अनेक नातेवाईक आणि आप्तेष्टांच्या चेहऱ्यावरचे  प्रीती आणि आदित्य ची जोडी बघितल्यानंतर चे भाव स्पष्टपणे प्रीतीला जाणवत होते पण आदित्य प्रत्येक क्षणी तिच्या सोबत होता आणि नजरेतूनच तो तिला सतत धीर देत होता. एक गोष्ट मात्र अजूनही प्रीतीच्या मनात खोलवर घर करून बसलेली होती – समाजाची रंगाच्या आधारावर लोकांना पाहण्याची दृष्टी!

लग्नाच्या रात्री आदित्यने विचारलं, “प्रीती, तू आज खूप शांत आहेस. काही त्रास होत आहे का?”

प्रीतीने न बोलता त्याच्याकडे पाहिलं, आणि थोडं थांबून उत्तर दिलं, “आदित्य, लोकांचे विचार तरी कसे बदलणार? मी सावळी आहे म्हणून मला इतक्या नकारांचा सामना करावा लागला. तू या सगळ्यांवर मात करून माझ्या आयुष्यात आलास, पण माझ्यासारख्या सगळ्यांना अशी संधी मिळेल का?”

आदित्यने तिचा हात हातात घेतला आणि हळूच म्हणाला, “प्रीती, समाज बदलायला कीर्ती वेळ लागेल मला माहित नाही, पण आपण सुरुवात करू शकतो. तू तुझ्या आत्मविश्वासाने आणि क्षमतांनी समाजाला दाखवशील की रंग म्हणजे काहीही नाही. तूच त्या सावलीतून प्रकाश आणशील यावर माझा पूर्ण विश्वास आहे”

त्या क्षणी प्रीतीच्या चेहऱ्यावर प्रसन्न हसू आणि आत्मविश्वास आला. ती सावळ्या रंगाची मुलगी आता सावलीतून बाहेर येऊन स्वतः निर्माण केलेल्या प्रकाशात चमकायला तयार होती...स्वतःचं नव अस्तित्व सिद्ध करायला..!

# अवचित होता भेट तुझी...




अवचित भेटींची कधी कल्पना नसते. अचानक घडलेली ती एक छोटी घटना आपलं जीवन कधी बदलून टाकेल, हे कोणालाच कळत नाही. अशीच एक सुंदर, रोमँटिक  कथा आहे सारिका आणि आर्यनची.

### सारिका:

सारिका ही एक स्मार्ट, आत्मनिर्भर मुलगी. ती एका मोठ्या कंपनीमध्ये प्रॉडक्ट मॅनेजर आहे. कामात व्यस्त असणं हा तिचा स्वभाव. तिला तिच्या

करिअरमध्ये खूप काही साध्य करायचं होतं. त्यासाठी तिने तिच्या वैयक्तिक आयुष्यात कधीच लक्ष दिलं नाही. प्रेम, नातं, हे सगळं तिच्यासाठी फक्त व्यवहारीक गोष्टी होत्या...

### आर्यन:

आर्यन हा एक फ्रीलान्सर होता. डिझाईन आणि फोटोग्राफीची त्याला आवड होती. तो जगभर फिरत असे आणि विविध ठिकाणी निसर्गाच्या सुंदर छायाचित्रणात गुंतलेला असे. त्याला त्याच्या आयुष्यात काहीच जबाबदारी नको होती. स्वतंत्रपणे आयुष्य जगायचं आणि मनाला येईल तसंच जगायचं, हे त्याचे तत्त्वज्ञान.

एका प्रसन्न सकाळी, सारिका आपल्या कामासाठी एका कॉन्फरन्सला दिल्लीला निघाली होती. तिच्या कामामुळे ती सतत प्रवासात असे. विमानतळावरच्या गर्दीत ती आपला बोर्डिंग पास शोधत असताना, अचानक तिच्या पर्समधला मोबाइल खाली पडला. ती पटकन वाकून मोबाइल उचलायला गेली, तितक्यात एक हात पुढे आला आणि त्या हातात तिचा मोबाइल होता.

“तुमचा फोन पडला,” त्या व्यक्तीने हसत म्हणलं.

सारिकाने वर बघितलं. तो आर्यन होता. साधा पण मोहक लूक, उंच बांधा आणि चेहऱ्यावर एक शांत स्मित. सारिकाने त्याचे आभार मानले आणि दोघांनी एकमेकांकडे पाहिलं. त्या क्षणात काही तरी वेगळं घडलं होतं. त्यांच्यात एक अज्ञात कनेक्शन जाणवलं.

ते दोघं एकाच फ्लाइटने मुंबईला जाणार होते. फ्लाइटमध्ये दोघं एकमेकांजवळचं बसले. ओळखीचा धागा पकडत त्यांनी गप्पा मारायला सुरुवात केली. सारिका व्यावहारिक आणि ठरवून चालणारी, तर आर्यन मुक्त आणि प्रवाही विचारांचा. दोघांचे आयुष्याकडे बघण्याचे दृष्टिकोन वेगळे होते, पण काहीतरी समान होतं, जे त्यांना एकत्र बांधत होतं.

गप्पा वाढत गेल्या, हसणं-मस्करी करणं, जगातल्या  विविध विषयांवर बोलणं, आणि त्या भेटीतच दोघांना कळलं की, त्यांच्या विचारांच्या दुनियेत एक सुंदर समांतर रेखा आहे.

फ्लाइट संपली, पण त्यांच्या भेटी तिथेच संपल्या नाही. दिल्लीच्या त्या अवचित भेटीनंतर दोघेही एकमेकांना भेटायला लागले. सारिकाचं शिस्तबद्ध आयुष्य आर्यनच्या स्वच्छंद विचारांमुळे बदलत गेलं, तर आर्यनचं मोकळं आयुष्य सारिकाच्या सहवासाने अधिक स्थिर झालं. हळूहळू त्यांच्या नात्यातला प्रेमाचा गोडवा वाढला. दोघेही एकमेकांशी खूप सहजपणे संवाद साधू लागले.

आधुनिक जगाच्या ताणतणावांमध्येही त्यांचं नातं फुलत होतं. करिअरच्या मागे धावताना, सारिकाला आर्यनमुळे आयुष्य कसं एंजॉय करायचं हे कळलं. त्याचप्रमाणे आर्यनला सारिकाकडून जबाबदारीचं महत्त्व कळालं. ते दोघं एकमेकांना पुरक होते.

एक दिवस, सारिका आणि आर्यन एका ट्रिपवर गेले होते. निसर्गाच्या सान्निध्यात ते दोघे एकमेकांशी मनमोकळं बोलले. तिथेच त्यांनी त्यांच्या नात्याला अधिक गोड आणि शाश्वत करण्याचा निर्णय घेतला. प्रेम ही एक सहज, अवचित घडणारी गोष्ट आहे, हे दोघांनाही उमगलं.

सारिका आणि आर्यनच्या जीवनातील ही अवचित भेट त्यांच्या आयुष्याला एक नवीन दिशा देऊन गेली. त्यांच्या प्रेमाच्या प्रवासाची सुरुवात कधी झाली, हे त्यांनाही कळलं नाही, पण ती नक्कीच चिरकाल टिकणारी होती...!

अशीच कधी ना कधी आपल्यालाही अवचित भेट घडते, जिच्या माध्यमातून आयुष्याचा खरा आनंद अनुभवायला मिळतो.

# चंद्र आहे साक्षीला...




कोजागिरी पौर्णिमेची रात्र होती. चांदणे सगळीकडे पसरले होते, जणू आकाशाने चांदण्यांच पांघरुण ओढलं होतं.

सायली, एक उत्साही आणि निसर्गप्रेमी मुलगी, तिच्या ऑफिस मधील मित्रमंडळीं समवेत कोजागिरी साजरी करण्यासाठी आली होती. ती मित्र मैत्रिणींबरोबर गप्पा मारत, निसर्गाचं सौंदर्य अनुभवत कोजागिरीच्या रात्रीचा आनंद घेत होती. तिच्या मनात मात्र एकच विचार होता—त्याचा..अर्णव चा! तिच्या ऑफिसमधला सहकारी, ज्याचं व्यक्तिमत्व सगळ्यांनाच प्रभावित करून घेत असे.

अर्णवचा अंदाज शांत होता, तो कमी बोलायचा, पण त्याच्या डोळ्यांमध्ये एक अनामिक आकर्षण होतं. सायली त्याच्याशी कधीच खूप बोलली नव्हती, पण प्रत्येक वेळी त्याला पाहिलं की तिचं मन धडधडायचं.

कोजागिरीच्या रात्रीच्या कार्यक्रमात दोघंही सहभागी होते. सायलीने दुधाचा ग्लास हातात घेतला आणि आकाशाकडे पाहिलं. ती मनातल्या मनात विचार करत होती की अर्णवशी कधी एकदा मोकळेपणाने बोलता येईल. अचानक तिचा  मित्र अर्णवला घेऊन तिच्या जवळ आला थोडा वेळ बोलून झाल्यानंतर त्याने सांगितलं, “सायली, अर्णवला तुझ्याशी काही बोलायचं आहे.” तेव्हा मी निघतो एन्जॉय युअर टाईम..

सायली थोडी गोंधळली, पण तिने स्वतःला सावरलं. अर्णव हसत तिला बघत होता, त्याच्या डोळ्यांत  वेगळेच भाव दिसत होते. तो म्हणाला, “सायली, मला  कधीपासून तुझ्याशी बोलायचं होतं, पण अनेकदा ठरवूनही मला जमत नव्हतं . आजच्या या चांदण्यांनी मला धाडस दिलंय. तुला कधीच सांगू शकलो नाही, पण तुझ्याबद्दल काहीतरी खास वाटतंय. मला तू खूप आवडतेस.  माझ्या मनात सतत तुझेच विचार असतात. आजच्या या पौर्णिमेच्या चंद्राच्या साक्षीने मी तुला विचारू इच्छितो—तू आणि मी, आपण एकत्र प्रेमाच्या नात्याची सुरुवात करूया का?”

सायलीच्या चेहऱ्यावर एकाच वेळी अनेक भाव आले. तीच हृदय जोरजोरात धडधडू लागल.  ती हळूच म्हणाली, “माझ्या ही मनात असंच काहीसं आहे, अर्णव.” त्या क्षणी दोघांची नजरा नजर झाली आणि ते आजूबाजूचं सगळं जग विसरले. त्यांनी आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याचे वचन दिले. त्यांच्या प्रेमाची सुरुवात कोजागिरीच्या या चांदण्याखाली झाली होती, जिथे चंद्राने त्यांच्या नात्याचा साक्षीदार होण्याचं ठरवलं होतं.

त्या रात्रीच्या शांत वातावरणात, चांदण्यांनी साक्ष दिली की हे प्रेमाचं नवं बीज भविष्यातल्या असंख्य रात्रींमध्ये उमलणार आहे..

# बाते कुछ अनकही सी....!

प्रिया कॉलेजमध्ये शिकणारी एक साधी सरळ पण स्मार्ट व स्वप्नाळू मुलगी होती. रोज कॉलेजला जाण येणं, मित्र मैत्रिणीबरोबर मजा करणं, अभ्यास करण हेच तिचं दैनंदिन आयुष्य होतं. तिचं मन नेहमी पुस्तकात आणि कल्पनांमध्ये रमलेल असे. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षी तिच्या वर्गात नवीन मुलाची एन्ट्री झाली ...तेजस! तो हुशार सर्वांशी बोलणारा आणि अत्यंत मनमिळाऊ होता. त्याच्या ओळखीने प्रियाच्या जीवनात एक वेगळाच प्रकाश आला. मित्र-मैत्रिणींच्या ग्रुपमध्ये आता तेजसही सामील झाला. प्रियाचं मन हळूहळू तेजस कडे आकर्षित होऊ लागलं, त्याचे शब्द ,त्याची वागणूक आणि त्याचं असणं हे सगळं तिला खूप हवंहवसं वाटत होतं. तिने तेजस पासून आपल्या भावना लपवून ठेवल्या होत्या, तिला त्याची ओढ वाटते आहे हे तिला त्याला इतक्यात जाणवू द्यायचं नव्हतं. तेजस नेहमीच तिच्याशी चांगलं वागत असे, तिला हसवत असे, कधी कधी तिच्या आवडीनिवडी बद्दल पण विचारत असे, पण त्याच्या मनात नक्की काय आहे हे तिला कधीच कळत नव्हतं, तो तिच्याबद्दल नक्की काय विचार करतो हे तिला जाणून घ्यायचं होतं. अनेक महिने गेले प्रिया व तेजस चांगले मित्र बनले, पण प्रिया ने तिच्या मनातलं प्रेम कधी बोलून दाखवलं नाही. तिने अनेक वेळा त्याला सांगायचं ठरवलं पण दरवेळी तिला असं वाटलं की तेजसच्या मनात तसं काही नसेल तर आपल्या एका वाक्याने आपल्या मैत्रीच नातही तुटेल ...आणि एक दिवस अचानक तेजसने प्रियाला कॅफेमध्ये भेटायला बोलावलं .मला तुला खास काहीतरी सांगायचं आहे असं म्हणाला. प्रियाला मनोमन खूप आनंद झाला ती अतिशय उत्साहाने वेळे आधीच निघाली .कॅफेमध्ये पोहोचून ती तेजस ची वाट बघत होती. तेजस समोरून येताना दिसला पण

त्याच्यासोबत एक मुलगी होती ...तेजस्वी! तेजस ने प्रियाशी ओळख करून दिली, आणि मला तुला हेच खास सांगायचं होतं असं म्हणून तेजस म्हणाला... हीच ती खास व्यक्ती आहे. आणि आमच एकमेकांवर खूप प्रेम आहे . हे ऐकून प्रियाच्या मनात एकाच वेळी अनेक भावना दाटल्या... दुःख, निराशा आणि उदासीनता पण तिने नेहमीच तेजसच्या आनंदाचा विचार केला होता. प्रियाने त्या दोघांचे अभिनंदन केले आणि स्वतःला सांभाळल . ती बाहेरून हसत होती पण आतून तिचं मन तुटत होतं .ती त्या दोघांचा निरोप घेऊन घरी आली. घरी येताच तिचा अश्रूंचा बांध फुटला .दुःखाचा वेग ओसरून गेल्यावर तिने स्वतःला सावरलं . तिने मनाला समजवलं की बरेचदा एकतर्फी प्रेम पूर्णत्वास येत नसतं पण त्याचं अस्तित्व मात्र त्या व्यक्तीच्या आयुष्याला अर्थ देत. तेजसच प्रेम जरी दुसऱ्या कुणावर असलं तरी प्रियाचं प्रेम मात्र तिच्या हृदयात सुरक्षित आणि जिवंत राहणार होतं. तिला मनोमन वाटत होतं की बरं झालं आपण तेजसला आपल्या भावना सांगितल्या नाही नाहीतर गुंता अजून वाढला असता. ती समजली होती प्रत्येक प्रेमाला प्रतिसाद मिळावा असं गरजेचं नसतं पण त्या प्रेमाचं अस्तित्वच माणसाला जगण्याची नवीन ऊर्जा देत. एखाद्या व्यक्तीने नाकारलं म्हणजे तिचं प्रेम नसतच असं नाही... तुमच प्रेम जर खरं, प्रांजळ ,निर्मळ , निस्वार्थी असेल तर समोरच्या व्यक्तीने ते मनोमन स्वीकारलेलंच असतं ..फक्त परिस्थितीमुळे, बंधनामुळे किंवा विचारांच्या संकुचततेमुळे ते नाकारल जात... लग्न म्हणजे प्रेमाची परिपूर्ती नव्हे... आठवणींनी भरलेल्या काळजाचा एक हळवा कोपरा आयुष्यभर सतत काहीतरी हरवल्याची जाणीव करून देत असतो आणि तीच प्रेमाच्या यशस्वीततेची पावती असते... प्रिया हळूहळू यातून पुढे गेली. आपल्या आयुष्याचा एक नवा अध्याय सुरू करण्यासाठी तयार झाली.तिच एकतर्फी प्रेम हे तिचं गुपित होतं पण हे गुपितच तिच्या जीवनाला नवीन दिशा देणार होत...!

# मन धागा धागा जोडते नवा...




विराज एक साधारण मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुण होता, जो स्वप्न बघण्यापेक्षा वास्तवात जगणं पसंत करत होता. त्याला आपल्या कामात स्थिरता आणि आपलं छोटंसं कुटुंब हवं होतं. त्याच्या आयुष्यात एक साधेपण होतं. तर अदिती, एका समृद्ध कुटुंबातली मुलगी, जिच जग स्वतःचं होतं. ती स्वाभिमानी, स्वावलंबी आणि अत्यंत स्वतंत्र होती.

दोघांचे पालक एकमेकांचे मित्र असल्यामुळे दोघांच्या पालकांनी त्यांच्या लग्नाची चर्चा सुरू केली होती. सुरुवातीला दोघांनीही या नात्याला नकार दिला होता. अदितीला वाटायचं की विराज तिच्या आवडीनिवडींना कधीच समजू शकणार नाही, तर विराजला वाटत होतं की अदितीच्या आधुनिक दृष्टिकोनाचा त्याच्या साध्या जीवनाशी कधीही मेळ बसणार नाही. पण त्यांच्या पालकांच्या आग्रहाखातर, त्यांनी शेवटी एकमेकांना भेटायचं ठरवलं.

पहिल्या भेटीतच त्यांच्या विचारात मोठी तफावत दिसून आली. अदितीचं हसतं बोलतं व्यक्तिमत्त्व विराजला अगदी अनोळखी वाटलं, तर विराजचा मितभाषी स्वभाव अदितीला रुचला नाही. परंतु त्यांचे पालक त्यांच्या निर्णयावर ठाम होते अशा प्रकारे, नाखुशीने त्यांनी या नात्याला होकार दिला, पण मनाने ते दोघेही या निर्णयावर आनंदी नव्हते.

लग्न झालं, पण एकमेकांशी मुळीच जुळवून घेता येत नाही म्हणून दोघेही एकमेकांपासून तटस्थ राहायचे. संवाद फार कमी असायचा. परंतु, हळूहळू विराजला अदितीच्या स्वावलंबी स्वभावाची आणि तिच्या सृजनशीलतेची ओळख होत गेली. त्याला तिचं चित्रकलेतलं कौशल्य लक्षात येऊ लागलं, आणि एकदा अदितीने त्याच्यासाठी रंगवलेलं चित्र पाहून तो स्तब्ध झाला. ते अतिशय सुंदर आणि गुढ अर्थ असलेलं होतं. त्याला कळलं की अदितीच्या अंतर्मनात खूप संवेदनशीलता आहे, जी तो सुरुवातीला ओळखू शकला नव्हता.

अदितीही विराजच्या साध्या पण निष्ठावान स्वभावाकडे आकर्षित होत गेली. त्याने कधीच तिच्या स्वभावाबद्दल तक्रार केली नाही, उलट तिच्या स्वातंत्र्याचा आदर केला. एकदा तो अचानक आजारी पडला, तेव्हा अदितीने त्याची

घेतलेली काळजी पाहून त्याला जाणवलं की तिच्या मनात प्रेमाचा उगम हळूहळू सुरू झाला आहे. विराजची ही काही वेगळी अवस्था नव्हती.

आणि हळूहळू, एकमेकांच्या सहवासात राहता राहता दोघांच्या मनात प्रेमाची रुजवात झाली. आता दोघेही एकमेकांसाठी एकमेकांच्या आवडीच्या गोष्टी आवर्जून करायला लागले...आणि एक दिवस दोघांचं प्रेम एकमेकांसाठी समर्पित झाल. अदितीने विराजच्या साधेपणात एक सुंदरता पाहिली, तर विराजने अदितीच्या असामान्य व्यक्तिमत्त्वात एक मोहकता शोधली. त्यांनी आपल्या संसाराचं स्वप्न एकत्र उभं केलं, जिथे आधुनिकता आणि साधेपणा हातात हात घालून नांदत होती.

हा त्यांचा प्रेमाचा प्रवास फक्त मनापासून स्वीकार करण्यावरच नव्हता, तर एकमेकांना समजून घेण्याचा, समर्पणाचा आणि एक सुंदर नातं फुलवण्याचा होता.

# माझीया प्रियाला प्रित कळेना...

आशा आणि अर्जुनचं लग्न एक उत्तम सोहळा होता. मित्रमंडळी, कुटुंब, सगळेच त्यांच्या जोडीचं कौतुक करत होते. आशाला अर्जुनसोबतचं आयुष्य सुंदर आणि शांत हवं होतं . आशाने अर्जुन ला मनापासून स्वीकारलं होतं . ती त्याचं मन जिंकण्यासाठी सतत त्याच्या अवतीभवती राहून त्याच्या आवडीच्या गोष्टी करायचा प्रयत्न करत असे. मन मोकळ बोलणे ,सगळ्या गोष्टी शेअर करणे याच्याने नात्यात जवळीक निर्माण होते आणि सहवासाने प्रेम वाढते यावर तिचा पूर्ण विश्वास होता. त्यामुळे ती सतत त्याच्याशी आपल्या मनातल्या सगळ्या गोष्टी शेअर करायची आणि आपल्या भावना वेळोवेळी व्यक्त करायची पण अर्जुन याच्या अगदी उलट होता .तो खूप कमी बोलायचा आणि मनातलं कधीही काहीही सांगायचा नाही की कधी त्याच्या भावना व्यक्त करायचा नाही. अशातच लग्नानंतर काही महिन्यांनी, एक गुपित समोर आलं ज्याने तिच्या मनावर खोल परिणाम केला.

एका संध्याकाळी, सहज गप्पा मारताना अर्जुनने हसत-हसत सांगितलं मला माझ्या ऑफिसमधली एक मुलगी खूप आवडायची पण नशिबाने काही जमलं नाही.”

हे बोलताना अर्जुनच्या चेहऱ्यावर कोणताही अपराधीभाव नव्हता. तो ते एक साधं आठवणींचं पान असल्यासारखं सांगत होता.

आशाला हा धक्का बसला. तिने शांतपणे विचारलं, “तुला तिचं अजून काही कधी आठवतं का?”

अर्जुनने कळत-नकळत उत्तर दिलं, "कधी कधी आठवतं, पण ते काय मोठं काही नाही. ती फक्त भूतकाळाचा एक भाग आहे."

आशाचं आयुष्य त्या रात्रीनंतर बदललं. अर्जुनसाठी हे काहीही महत्त्वाचं नव्हतं, पण तिच्या मनात एक न संपणारं चक्र सुरू झालं. तिला वाटलं, "माझा नवरा अजूनही तिच्या आठवणीत अडकलेला आहे का? मी त्याच्यासाठी खरोखर विशेष आहे का?"

ती त्याच्या प्रत्येक वागण्यात खोल अर्थ शोधू लागली. तो तिच्याशी हसत बोलला तरी तिला तो तिला फसवत असल्यासारखं वाटायचं. तो फोनवर कुणाशी तरी बोलत असला, किंवा तिच्याशी थोडा अंतर राखत असला की तिच्या मनात संशय येई.

आशाने तिच्या भावना अर्जुनला सांगण्याचा प्रयत्न केला.

"मला तुझ्या भूतकाळाशी काही प्रॉब्लेम नाही, पण तू मला ती गोष्ट अशा प्रकारे सांगितलीस की जणू ती काहीच महत्त्वाची नाही, आणि त्यामुळे माझ्या मनाला खूप ठेच पोहोचली आहे," ती म्हणाली.

अर्जुनने खांदे उडवत उत्तर दिलं, "आशा, तू उगाचच या गोष्टीचा विचार करते आहेस. ती माझ्या भूतकाळातली होती, आता काही संबंध नाही. तू इतकं का सीरियस होतेस?"

त्याच्या बेफिकिरीने आशाच्या वेदना आणखीनच वाढल्या. तिला वाटलं, "मी त्याच्यासाठी इतकी अप्रासंगिक आहे का? त्याला माझ्या भावना समजत नाहीत का?" तिच्या मनावरचा ताण वाढत गेला.

हे सगळं तिच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करू लागलं. ती चिडचिड करू लागली, सगळ्यांपासून लांब राहू लागली. तिला स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न

भेडसावू लागला. “जर तो अजूनही तिच्या आठवणीत अडकलेला असेल, तर मी का त्याच्या आयुष्यात आहे?”

तिने स्वतःला यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण अर्जुनच्या बेफिकिरीमुळे ती अधिकच अस्वस्थ होत गेली. त्याला तिच्या भावनांचं गांभीर्य कधी समजलंच नाही. त्याच्यासाठी ते एक संपलेलं पान होतं, पण आशासाठी ती आठवण त्यांच्या नात्याच्या प्रत्येक कोपऱ्यात जिवंत वाटत होती.

आशाने ठरवलं की तिला स्वतःसाठी उभं राहायचं आहे.  तिला जाणवलं की अर्जुनला बदलणं तिच्या हातात नाही, पण स्वतःला सावरणं मात्र तिच्या हातात आहे.

तिने तिच्या मनाचा निग्रह करून स्वतःला बदलायला सुरुवात केली. ती स्वतःच्या छंदांमध्ये रमू लागली, स्वतःचं आयुष्य सुंदर बनवण्याचा प्रयत्न करू लागली. तिने अर्जुन कडून तितकी अपेक्षा ठेवणं सोडून दिलं.

आशाने अर्जुनशी एक अंतिम संवाद साधला.

“तुला माझ्या भावनांचा कधीही विचार करायचा नाहीये, अर्जुन. मला जेव्हा दुःख होत होतं , तेव्हा तू तुझ्या जगातच रमलेला होता. माझ्यासाठी हे नातं फक्त त्या भूतकाळाच्या सावलीत जगायचं नाही. आता मला पुढे जावं लागेल.”

त्या संवादानंतर अर्जुनला आपली चूक उमगली का, हे सांगता येणार नाही. पण आशाने ठरवलं की तिच्या आयुष्याचा प्रवास आता तिच्या निर्णयांवर अवलंबून असेल.  तिने मनोमन देवाची प्रार्थना केली की एक दिवस अर्जुन ला हे उमजेल की

भावनिक बेफिकिरी आणि संवादाचा अभाव नात्याला हळूहळू पोखरतो.

# बंदिशाळा

शहरातल्या एका आलीशान अपार्टमेंटमधल्या फ्लॅटमध्ये, सुमेधा नेहमीप्रमाणे स्वयंपाकघरात काम करत होती. तिच्या चेहऱ्यावर शांतता दिसत होती, पण तिच्या मनात अनेक विचारांचे काहूर निर्माण झाले होते. सुमेधा आणि समीरचं लग्न आज चौदा वर्षांपासून टिकून होतं. त्यांचं लग्न अरेंज होतं. समीर एका साध्या कुटुंबातून आला होता, तर सुमेधा सुशिक्षित, मध्यमवर्गीय घरातील मुलगी होती.

समीरचं एके काळी प्रेम प्रेयसीकडून नाकारलं गेल्यानंतर त्याने लग्नासाठी घरी होकार दिला होता. सुमेधाला त्याच्या मनात दुसऱ्या कोणाचं स्थान आहे याची लग्नाच्या आधी कल्पना नव्हती. ती स्वप्नांनी भरलेली नववधू होती. पण लग्नाच्या पहिल्या काही महिन्यांतच तिला जाणवलं, समीर तिच्या जवळ असूनही तिला कधीच पूर्णपणे आपलंसं करणार नव्हता.

समीर एक जबाबदार नवरा आणि चांगला वडील होता. मुलांचे शिक्षण, त्यांची जबाबदारी, घर चालवण्यामध्ये तो कधीच कमी पडला नाही. पण सुमेधाला नेहमी जाणवायचं की, समीरचं तिच्याकडे पाहणं हे फक्त जबाबदारीतून आहे, प्रेमातून नाही. तो तिला एक चांगला जीवनसाथी म्हणून वागवायचा, पण त्या वागण्यात भावनिक जवळीक कधीच नव्हती.

सुमेधा सुरुवातीला खूप प्रयत्न करत होती. तिच्या बोलण्याला प्रतिसाद मिळावा म्हणून, त्याला तिच्या भावनांमध्ये सामील करून घेण्यासाठी. पण प्रत्येकवेळी तिला एक अदृश्य भिंत जाणवायची. समीर तिच्या नजरेला नजर देत

नसे. त्याचा तो ओढून घेतलेला संवाद तिला तिच्या एकटेपणाची जाणीव करून द्यायचा.

वर्षे सरली, दोघांना दोन मुलं झाली. मुलांच्या आयुष्यात रमून सुमेधाने तिच्या दुःखाला बाजूला ठेवलं. पण रात्रीच्या वेळी, सगळं घर झोपल्यावर तिचं मन तिला प्रश्न विचारायचं—"का नाही मिळत मला हे प्रेम? माझ्यात काही कमी आहे का?"

एकदा सुमेधाने समीरला थेट विचारलं, "तुला कधी वाटलं नाही का की, आपण एकमेकांसोबत आपल्या आयुष्याला वेगळं वळण देऊ शकतो?"

समीर उत्तर देत म्हणाला, "सुमेधा, तुझ्या मध्ये मला कधीच काही वाईट दिसल नाही. पण मला प्रेम करणं जमत नाही. हे असंच आहे."

हे ऐकून सुमेधा सुन्न झाली. तिला समजलं की, ती जी काही वाट पाहत होती, ती कधीच पूर्ण होणार नाही. पण तिने ही सत्यता स्वीकारली. तिचं मन मारून, स्वतःसाठी एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करायचा ठरवलं.

सुमेधाने तिच्या आयुष्यात काहीतरी नवीन केलं—ती तिच्या आवडीप्रमाणे पेंटिंग्स बनवू लागली. तिच्या पेंटिंग्स मध्ये तिने तिच्या दुःखाचं प्रतिबिंब उमटवलं, पण ते खूप जणांच्या मनाला भिडलं. तिच्या पेंटिंग्स ना अनेक पुरस्कार मिळाले, आणि ती स्वतःसाठी एक स्वतंत्र स्थान निर्माण करू लागली.

समीरने तिच्या यशाला आनंदाने पाठिंबा दिला, पण त्याने तिच्या पेंटिंग्स मागच्या भावना कधीच समजून घेतल्या नाहीत. त्याच्यासाठी सुमेधा नेहमी त्याची पत्नीच होती, पण तिच्या पेंटिंग्सने तिची जगाला नव्याने ओळख करून दिली.

सुमेधाचं आयुष्य तिच्या पेंटिंग्सच्या माध्यमातून एका वेगळ्या वळणावर आलं. ती बाहेरून एक यशस्वी स्त्री वाटत होती, पण आतून ती आजही तिच्या संसाराच्या ओसाड वाळवंटात अडकलेली होती.

एका व्याख्यानानंतर ती घरी येताना विचार करत होती , “माझं आयुष्य एक बंदिशाळा आहे पण त्यातूनच मी माझं उड्डाण शोधलं. प्रेम नसतानाही मी माझं स्वतःचं जग उभं केलं, पण कधी कधी वाटतं, जर प्रेम मिळालं असतं, तर काय बदललं असतं?”

तो प्रश्न आजही अनुत्तरित आहे, पण सुमेधा मात्र तिला मिळालेल्या आयुष्यात शांततेत सामंजस्य साधत जगत आहे.

# दुसरी संधी...




स्वाती आणि अनिकेतच्या लग्नाला दहा वर्ष झाले होते. सुरुवातीचे दिवस सगळ ठीक होत. स्वाती अतिशय संवेदनशील आणि हळवी होती, प्रत्येक गोष्ट मनाला लावून घेणारी , प्रत्येक क्षणात आनंद शोधणारी. तिच्यासाठी प्रेम म्हणजेच जगणं होतं. अनिकेत मात्र याच्या अगदी उलट. तो थोडा बेफिकीर स्वभावाचा, असंवेदनशील आणि भावनिक नसलेला ..विषय एकदाच सांगून बंद करणारा...

स्वातीला वाटायचं की अनिकेतने  दिवसभर तिच्याशी संपर्कात रहावं, फोनवर बोलावं, तिच्या लहानसहान भावना समजून घ्याव्यात, तिच्या सोबत हसावं-खेळावं. पण अनिकेतला हे सगळं कधी जमलंच नाही. त्याचं प्रेम ना त्याने कधी व्यक्त केलं, ना कधी शब्दांमध्ये किंवा भावनांमध्ये ते स्पष्ट दिसल. स्वाती आणि त्याच्यामध्ये जर काही बिनसल तर त्यानंतर तिला मनवायचं हे ही कधी त्याने केलं नाही. त्याला ते  गरजेचं वाटायचं नाही. तो गृहीत धरायचा की सगळ आपोआपच नीट होईल. तो आपल्या  आयुष्यात स्वतःच्या वेगाने चालत होता, तर स्वाती त्यात मागे पडत चालली होती.

हळूहळू स्वातीने हे सगळं स्विकारलं. तिचं मन मात्र आतून तुटत गेलं. तिच्या डोळ्यातलं प्रेम कमी झालं, आणि ती अनिकेतसोबत एक व्यवहारिक नातं ठेवू लागली. ती प्रेमापेक्षा जबाबदारी म्हणून हे नातं जपत होती.

काही काळ असाच गेला. अनिकेतला कधीच लक्षात आलं नव्हतं की स्वाती किती आतून दुःखी होती.  एक दिवस   ऑफिसमध्ये त्याच्या एका जुन्या कॉलेजचा मित्र निलेश चा त्याला फोन आला आणि तो त्या शहरात कामासाठी आला आहे म्हणून संध्याकाळी त्याला भेटण्याच त्याने निमंत्रण दिल. ऑफिस सुटल्यावर संध्याकाळी अनिकेत कॅफेमध्ये मित्राला भेटायला गेला ,त्याच्याकडे त्याच्या कुटुंबाची चौकशी करताना त्याला कळलं की निलेश ची बायको काही महिन्यांपूर्वीच अचानक हे जग सोडून गेली. निलेश तिच्याविषयी बोलताना अतिशय भावनिक झाला होता आणि त्याला त्याच्या आयुष्यात त्याने तिच्याबद्दल केलेल्या चुकांचा खूप पश्चाताप होत होता. तो अनिकेतला म्हणाला की, आपला माणूस जेव्हा आपल्याजवळ असतो तेव्हा आपण त्याची कदर करत नाही आणि नंतर आपल्याकडे पश्चातापाशिवाय काहीच राहत नाही. अनिकेतच्या लक्षात आलं की

त्याने स्वातीच्या भावनांकडे दुर्लक्ष केलं होतं. त्याला अपराधी वाटल. तीला गमावण्याच्या भीतीने तो मनातून घाबरला.

त्याने ठरवलं की आता स्वातीला पुन्हा हसवायचं, तिच्या मनाला पुन्हा प्रेमाची अनुभूती द्यायची. त्याने स्वतःत बदल घडवायला सुरुवात केली. आता तो स्वातीच्या प्रत्येक लहानसहान गोष्टीकडे लक्ष देत होता. तिच्या सोबत वेळ घालवत होता. तिच्या आवडी-निवडी समजून घेत होता. तिच्या मेसेजला उत्तर न देणारा आता स्वतः मेसेज करत होता, तिचं मन जपण्यासाठी गोड शब्द बोलत होता.

स्वातीला त्याचा हा बदल दिसत होता, पण तिचं मन परत एकदा विश्वास ठेवायला तयार नव्हते. तिला वाटत होतं, "जर पुन्हा असं काही झालं तर काय?" ती स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी त्याच्याशी जपून वागत होती.

परंतु, अनिकेत ठरवून आलाच होता की तो स्वातीचं हरवलेलं हसू परत आणेल. तो रोज नवीन प्रयत्न करत होता. त्याने तिच्यासाठी स्वतःमध्ये अनेक बदल केले , तिला आवडत नसलेल्या गोष्टी करायचं प्रकर्षाने टाळायला लागला, तिच्या आवडत्या मालिकां साठी वेळ काढला, तिच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. हळूहळू, स्वातीचं मन वितळायला लागलं,पण ती खुलत नव्हती.

एक दिवस, ऑफिस मधून येताना अनिकेतच्या बाईकचा एक्सीडेंट झाला आणि हॉस्पिटल मधून तिला फोन आला. ती धावत हॉस्पिटलमध्ये पोहोचली. अनिकेतला सुखरुप पाहून तिला खूप हायस वाटल आणि खूप आवेगाने तिने अनिकेतला मिठी मारली. अनिकेतने तिला डोळ्यात डोळे घालून सांगितलं, "स्वाती, मी तुझ्यावर खूप प्रेम करतो. माझ्या आयुष्यात तुझ्याशिवाय काहीच नाही. मला जाणीव आहे की मी तुला खूप दुखावलं, पण मला परत एक संधी दे. मी आधीच्या कुठल्याच चुका परत होऊ देणार नाही ,मी तुला कधीच दु:खी होऊ देणार

नाही.” त्याच्या डोळ्यात पाणी होतं, आणि स्वातीला तो प्रामाणिकपणे बोलत असल्याचा विश्वास वाटला.

त्या दिवशी स्वातीने ठरवलं की तीही त्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देईल. दोघांनी पुन्हा एकमेकांशी संवाद साधायला सुरुवात केली. नव्याने नातं उभं करायला लागले.

आणि मग एक दिवस, त्यांच्या आयुष्याचा सुर त्यांना पुन्हा एकदा गवसला. त्यांचं प्रेम पुन्हा फुललं, आधीपेक्षाही सुंदर आणि घट्ट! त्यांनी प्रेमाला दुसरी संधी दिली, आणि ती त्यांचं आयुष्य बदलून गेली..

# सूर्योदय प्रेमाचा...




नेहा एक स्वप्नाळू संवेदनशील मुलगी, एक महत्त्वाकांक्षी लेखिका.. ती आपल्या नवीन कादंबरीसाठी शोधत होती काही वेगळं, जिवंत कथानक.

आदित्य, एक तरुण फोटोग्राफर, स्वतःच्या कॅमेऱ्यातून जगाला नव्या दृष्टिकोनातून पाहायचा प्रयत्न करत असलेला.

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, नेहा आणि आदित्यच्या आयुष्याच्या वाटा अनपेक्षितपणे जुळल्या होत्या...

नेहा एका कॅफेमध्ये बसून आपल्या लॅपटॉपवर काहीतरी लिहीत होती, पण विचारांची जुळवाजवळ होत नव्हती. तिच्या मनाचा ठाव घेणारा शब्द सापडत नव्हता. ती विचारात हरवलेली असताना  आदित्यचा कॅमेरा तिच्यावर स्थिरावला. त्याने अनाहूतपणे तिचा फोटो काढला, ते तिच्या लक्षात आलं आणि ती पटकन चिडली.

"तुमचं काय चाललंय? परवानगीशिवाय फोटो का काढलात?" नेहा थोडीशी रागाने म्हणाली.

"तुमचा चेहरा एवढा निरागस आहे की तो टिपणं भागच होतं," आदित्यने हसत उत्तर दिलं. दोघांमध्ये थोडासा वादविवाद झाला पण

या वादातून दोघांमध्ये बोलण्याला सुरुवात झाली. त्यांनी एकमेकांचे नंबर घेतले आणि बाय म्हणून निघाले, पण त्यानंतर ते सतत संपर्कात राहिले. आदित्य नेहमीच नेहाच लिखाण सोशल मीडियावर वाचायचा आणि नेहा ही आदित्य ची फोटोग्राफी सोशल मीडियावर बघत होती. हळूहळू दोघं मित्र झाले, भेटीगाठी वाढल्या, ती दोघं एकमेकांच्या आयुष्यातील रिकाम्या जागा भरून काढायला लागले.  आदित्यने नेहाला सांगितलं की तो साध्या क्षणांमध्ये सौंदर्य शोधतो, तर नेहाने आदित्यला सांगितलं की ती एका वास्तववादी प्रेमकथेचा शोध घेत आहे.

नेहा आदित्यसोबत भटकायला लागली. त्याच्या फोटोग्राफीच्या मोहक जगात ती हरवली, तर आदित्य तिच्या लिखाणाच्या धुंदीत हरखून गेला. तो नेहाला

समजावून सांगायचा की फोटो हा क्षणाचा आत्मा असतो, तर ती त्याला म्हणायची की लेखणी ही हृदयाचा आवाज आहे.

एक दिवस, त्याने तिला वसईच्या एका जुन्या किल्ल्यावर नेलं. सूर्य मावळताना, तिच्या चेहऱ्यावर पडणाऱ्या कोवळया किरणांचा फोटो काढत आदित्यने विचारलं, "नेहा, तुझी वास्तववादी प्रेम कथा कशी असावी असं तुला वाटतं?"

नेहा गोंधळून म्हणाली, "मला वाटतं, मैत्री आणि प्रेमाने भारलेली"

"तर मग, ती तुझी आणि माझी असू शकते का?" आदित्यने गंभीरपणे विचारलं.

नेहाचं मन धडधडू लागलं. कदाचित तिला कधीच असं वाटलं नव्हतं की तीच्याही आयुष्यात तिच्या कथानकांमध्ये घडतं तसं घडेल. तिच्या आयुष्याची ही एक प्रेमकथा होईल. ती म्हणाली,

"प्रेम कथा ही कधीच ठरवलेली नसते आदित्य पण तुझ्यासोबतचा प्रवास सुंदर आहे, आणि कदाचित त्यातच खरी कथा आहे."

त्या दिवशी सूर्य मावळला, पण त्यांच्या प्रेमाचा सूर्योदय झाला. त्या क्षणापासून, नेहाचं लिहिणं आणि आदित्यचा कॅमेरा, दोन्ही एकत्र येऊन एक अतुलनीय कहाणी तयार करत राहिले.

# शब्दांचे ओझे

समीधा एक सुंदर, हुशार, आणि स्वाभिमानी मुलगी होती. कॉलेजमध्ये तिचं सौंदर्य आणि आत्मविश्वास पाहून अनेक मुलं तिच्या मागे होती. ऑफिसमध्ये ही ती सर्वांची लाडकी होती मात्र समीधाला तिच्या आयुष्याबद्दल वेगळया अपेक्षा होत्या, त्यामुळे तिनं अभ्यास काम यावर जास्त लक्ष दिले. काही वर्षात तिच्या घरात लग्नाची चर्चा चालू झाली आणि तिच लग्न अरेंज मॅरेजद्वारे झाल.

आकाश  तिचा जोडीदार झाला. आकाश एक सभ्य  आणि स्वतःच्या कामात रमलेला माणूस होता. लग्न झाल्यानंतर काही दिवस सगळं स्वप्नवत वाटत होतं. दोघांचा  सहवास आणि नवलाई  यामुळे घर आनंदाने भरलेलं होतं.  या सर्वातच

लवकरच ते एका गोंडस बाळाचे आई-वडील झाले. आई होण्याचा अनुभव समीधासाठी खास होता, पण त्याचवेळी तिला जाणवत होतं की तिच्या शरीरावर मातृत्वाचे परिणाम होत होते. त्या सगळ्याशी जुळवून घेणे तिला जड जात होते. पण तरीही ती सगळे प्रयत्न करत होती. सर्व स्थिरसावर झाल्यावर काही वर्षांत, दुसऱ्या बाळाचा जन्म झाला. या प्रक्रियेमुळे तिचं शरीर पूर्णपणे बदललं. वाढलेलं वजन, थकवा, आणि काही आजारामुळे  ती स्वतःला आरशात पाहताना ओळखू शकत नव्हती.

आकाश समीधाच्या या बदलांना स्वीकारायला तयार नव्हता. तो तिला सतत तिच्या वजनाबद्दल टोमणे मारायचा.  "थोडं स्वतःकडे लक्ष दिलं असतंस तर चांगलं झालं असतं," व्यायाम करत नाही, चांगलं राहात नाही असे त्याचे शब्द

समीधाला वारंवार टोचायचे. चार लोकात जाऊन आल्यावर, नातेवाईकात सतत आकाश तिला दुसऱ्यांशी कम्पॅरिझन करून बोलायचा . तिचं मन चिरडून जात होतं. खरंतर ती स्वतः पण अतिशय ताणात होती तिच्यासाठी हे सगळं अजिबात सोप्प नव्हतं  कारण ती स्वतःही उच्चशिक्षित होती आणि तिला काहीतरी करायची इच्छा कायमच होती पण मुलं घर यासाठी आधीपासूनच दोघांनी ठरवल्याप्रमाणे स्वतःचे सगळं बाजूला ठेवून पूर्ण वेळ ती कुटुंबाला देत होती. अशातच तिच्या हातून सुटून चाललेलं बाहेरचं जग, मित्र परिवाराशी नाहीसा झालेला संपर्क आणि एकाकी पण याने ती मनातून खचून चालली होती. तिला वाटायचं याने आपलं मन समजून आपल्याला साथ द्यावी. आपल नैराश्य दूर कराव. तु जशी आहेस तशी मला खूप आवडते असं म्हणाव. ती कुटुंबासाठी करत असलेल्या प्रयत्नामध्ये तिला ॲप्रिसिएट करावं.

समीधा दिवस-रात्र मुलांना सांभाळण्यात, घर सांभाळण्यात आणि स्वतः आतल्या आत कुढत होती.पण हळूहळू, तिच्या आत एका क्षणिक ठिणगीने जाग येऊ लागली. ती स्वतःशी म्हणाली, *"माझ्या शरीरावर आणि माझ्या मनावर कोणाचंही नियंत्रण असायला नको. मी स्वतःसाठी काहीतरी करायला हवं."*

समीधाने ठरवलं की ती स्वतःच्या आयुष्यावर पुन्हा प्रेम करायला शिकेल. तिने तिच्या आवडीच्या गोष्टी करायला सुरुवात केली. स्वतःचे छंद जोपासायला लागली. नवीन गोष्टी शिकली, स्वतःच्या व्यक्तिमत्व सुधारल. तिच्या कामामुळे तिला थोडी ओळख मिळायला लागली. लोकांच्या सकारात्मक प्रतिक्रिया ऐकुन तिला ऊर्जा मिळायला लागली.  तिच्यात सकारात्मक बदल दिसू लागले. तिला आत्मविश्वास आला. ती हळूहळू तिच्या जुन्या रूपात परत येत होती, पण यावेळी ती अधिक ठाम आणि जबाबदार होती. तिने स्वीकारलं होतं की शरीरातले बदल हे

काळानुरूप होणारच पण आपलं मन तसंच असायला हवं. त्यात बदल होता कामा नये.

पण हा प्रवास सहज नव्हता. आकाश अजूनही तिच्या प्रयत्नांना हलक्यातच घेत होता. त्याला वाटायचं की हे सर्व तिने त्याच्या टोमण्यांमुळेच केलं आहे. पण समीधाला आता हे समजलं होतं की तिचा हा प्रवास स्वतःसाठी आहे.

समीधाचं नवीन रूप आकाशाला पुन्हा तिच्या प्रेमात पाडायला लागलं. तो पुन्हा तिच्याकडे आकर्षित झाला. पण आता समीधा भावनिकरीत्या त्याच्यापासून खूप दूर गेली होती. ती हसत हसत म्हणायची, *"तुला माझं शरीर दिसत होत, माझं मन कधीच महत्त्वाचं नव्हतं."*

आकाशाला तिच्या या शब्दांचा अर्थ समजायला वेळ लागला. त्याने मागील काळ आठवला, ज्या क्षणी तो तिला आधार देऊ शकला असता पण त्याऐवजी तिला फक्त कमीपणा दाखवला. त्याला आपली चूक जाणवली.

आकाशने समीधाची माफी मागितली. पण समीधाचं मन त्या जुन्या जखमांनी इतकं भरलं होतं की ती त्याला पुन्हा स्वीकारायला तयार नव्हती. ती म्हणाली, "मी आता माझ्या स्वतःच्या आनंदासाठी जगते. तू मला माझ्या नैराश्याच्या काळात साथ दिली नाहीस, त्यामुळे तुझं माझ्यासाठी असलेल आकर्षण आता मला काहीच देऊ शकत नाही." पण या प्रवासातून मला कळलं की स्वतःवर प्रेम करणं हे सर्वांत महत्त्वाचं आहे.

समीधा तिच्या आयुष्यात एकटीनेही समाधानी झाली. तिने स्वतःसाठी एक नवीन ओळख निर्माण केली. आकाश मात्र त्या नात्याच्या सुंदर आठवणी आणि आपल्या चुकांचा पश्चात्ताप करत एकटाच राहिला.

*ही कथा सांगते की नात्यात प्रेम हवं, पण आदर आणि पाठिंबा त्याहून महत्त्वाचा असतो. आपल्या सहचराच्या संघर्षात त्याला साथ न दिल्यास, त्याच्या यशात आपली जागा उरत नाही.*

## ओढ तुझी...




अन्वेषा आणि ईशान पहिल्यांदा मुंबईच्या एका पुस्तक प्रदर्शनात भेटले होते. दोघांनाही वाचनाची जबरदस्त आवड. एका स्टॉलसमोर एकाच वेळी त्यांनी एकच पुस्तक उचललं– **"Love in the Time of Cholera"**.

“हे माझं आवडतं पुस्तक आहे!” अन्वेषाने उत्साहाने म्हटलं.

“माझंसुद्धा!” ईशान हसत म्हणाला.  इथे त्यांची एकमेकांशी ओळख झाली त्यांनी वेगवेगळया पुस्तकांबद्दल भरपूर गप्पा मारल्या, एकमेकांचे नंबर घेतले

त्या दिवसापासून त्यांच्या गप्पा वाढल्या आणि मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. अन्वेषा कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होती आणि ईशान शिक्षण पूर्ण करून नोकरीसाठी प्रयत्न करत होता.दोघे एकत्र फिरायचे, एकमेकांसाठी सरप्राईज गिफ्ट्स आणायचे आणि रविवारच्या संध्याकाळी कॅफेमध्ये लाँग टॉक करायचे.  एक दिवस ईशानला लंडन मधून एक खूप मोठी जॉब ऑफर आली .जॉब स्वीकारला तर एकमेकांपासून लांब राहावं लागेल या विचारांनी दोघांनाही वाईट वाटत होतं पण भविष्य चांगलं होण्यासाठी काही काळ एकमेकांपासून लांब राहायचं ,आपलं नातं असंच घट्ट आणि सुंदर ठेवायचं असं त्यांनी ठरवलं.

ईशान लंडनला गेल्यावर सुरूवातीचे काही दिवस ठीक होते. रोज व्हिडिओ कॉल, रात्री उशिरापर्यंत चॅटिंग, आठवड्यातून एकदा ऑनलाइन मूव्ही डेट··· पण हळूहळू वेळ कमी मिळू लागला. ईशानच्या नोकरीच्या जबाबदाऱ्या वाढल्या, तर अन्वेषाही आपले शिक्षण पूर्ण करून एक छानशी नोकरी करून आपल्या आयुष्यात पुढे जात होती.

पावसाच्या सरींनी भिजलेल्या संध्याकाळी अन्वेषा बाल्कनीत उभी होती. तिच्या हातात गरम कॉफीचा मग होता आणि डोळयांमध्ये आठवणींचे मोती. फोनवर आलेला मेसेज तिने पुन्हा उघडून पाहिला—

**”मी खूप मिस करतोय तुला, अनु”

एक वर्ष झाले होते, ईशान लंडनला गेला होता. अंतर वाढलं तसं संवाद कमी होत गेला…

त्या रात्री अन्वेषा एकटीच रडत बसली होती. फोनवर ईशानचा मेसेज दिसला—

मी तुला विसरलो नाही ग! फक्त वेळ देऊ शकत नाही… पण मी अजूनही तुझाच आहे!”

तिला समजत नव्हतं की हे नातं पुढे टिकेल का? की अंतराच्या वाढत्या भिंती दोघांना वेगळं करतील? काही दिवस असेच गेले अन्वेषा गुमसुम ,उदास राहत होती तिचं कशातही मन लागत नव्हतं. ईशान सोबतच्या नात्यात दुरावा आल्याच तीला जाणवत होत. इशान ची अवस्था काही वेगळी नव्हती तो अतिशय कामात बुडालेला होता पण तरीही अन्वेषा चा विचार त्याच्या मनातून क्षणभरासाठी जात नव्हता...

एका रात्री, अचानक दरवाज्यावर बेल वाजली. अन्वेषाने दरवाजा उघडला आणि समोर ईशान उभा होता!

“ईशान?” तिचा डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता.

तो तिला मिठीत घेत म्हणाला. मी खूप विचार केला पण आता मी तुझ्यापासून लांब नाही राहू शकत...

अन्वेषाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

“पण तुझी नोकरी?

मी मुंबई मध्ये नवीन जॉब घेतला आहे. आता मी इथेच राहणार.

“ प्रेम हे फक्त एकदाच मिळतं··· आणि मी ते गमवू शकत नाही!” तुझ माझ्या आयुष्यात असणं हे माझ्यासाठी इतर कशाही पेक्षा खूप महत्त्वाच आहे.

त्या संध्याकाळी पाऊस पडत होता, आकाश मोकळ झालं आणि अन्वेषाच्या आयुष्यातला तणाव ही हलका झाला होता. आता ते दोघं पुन्हा एकत्र होते, डिस्टन्स मिटला होता, आणि प्रेम अधिक घट्ट झालं होतं.

कधीकधी अंतर वाढलं तरी प्रेम कमी होत नाही. खरं प्रेम वेळेच्या, जागेच्या आणि परिस्थितीच्या बंधनात अडकत नाही. ते फक्त टिकून राहतं– अधिक सुंदर, अधिक मजबूत.

# उसवले धागे कसे कधी...




राज आणि सायली यांचं अरेंज मॅरेज झालं, पण त्यांचं नातं कधीच त्या सुंदर स्वप्नांसारखं नव्हतं, ज्याची सायलीने कल्पना केली होती. सायली खूप हळवी स्वप्नाळू होती प्रेम आपुलकी एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणं भावना समजून घेणे या गोष्टी तिच्यासाठी खूप महत्त्वाच्या होत्या. तिला वाटायचं की तिचा

नवरा तिच्या स्वप्नांमध्ये रंग भरेल, तिच्या भावना समजून घेईल, आणि तिच्यावर मनापासून प्रेम करेल. पण राज याच्या अगदी विरुद्ध स्वभावाचा होता. तो प्रॅक्टिकल होता, प्रेमासारख्या भावना त्याच्या दृष्टिकोनातून फक्त व्यवहारापुरत्या होत्या. तो तिच्या भावनांना किंमत देत नसे.

सायलीने खूप प्रयत्न केले तिचे प्रेम त्याच्या शब्दात उमटावे ,तिच्या भावना त्याला समजाव्या, तिच्या हृदयाची हाक त्याने ऐकावी ,पण प्रत्येक वेळी अपेक्षाभंग होत गेला. ती त्याच्यासोबत मनमोकळ बोलायचा प्रयत्न करायची पण तो नेहमी असं काही नाही म्हणून विषय टाळून द्यायचा. तिच्या प्रेमभऱ्या नजरा ,तिच्या लहानशा अपेक्षा ,सगळं तो दुर्लक्षित करत राहिला.ती कधी त्याच्यासाठी आवडते पदार्थ बनवायची , कधी त्याच्या थकलेल्या दिवसाच्या शेवटी त्याला प्रेमाने विचारायची *”आज कसा गेला दिवस?”* पण त्याला तिच्या या गोष्टींचं काहीच महत्त्व नव्हतं. तो नेहमीच बेफिकीरपणे उत्तर द्यायचा, कधी तिच्या भावना समजूनच घ्यायचा नाही. काही वेळा ती दुखावली जायची, डोळ्यांतून अश्रू वाहायचे, पण तरीही तिच्या मनात आशेचा एक किरण असायचाच—*कधीतरी तो बदलेल, कधीतरी त्याला कळेल माझं प्रेम!*

पण ते कधीच घडलं नाही. तिच्या मनात विचार आला माझ्या अस्तित्वाची अशी उपेक्षा सहन करण्यापेक्षा मी स्वतःसाठी जगायला हवं.

एक दिवस, सायलीने निर्णय घेतला. तीने राजला पत्र लिहिलं

गुंतणे माझे सरेना तू फिरवली पाठ...

पावलांना ही कळेना का हरवली वाट...—राज *”मी तुझ्यावर खूप प्रेम केलं, तुझ्या स्वभावाचा स्वीकार करण्याचा प्रयत्न केला. पण प्रेम हे एकतर्फी नसतं.

माझ्या भावना तुझ्यासाठी कधीच महत्त्वाच्या नव्हत्या. मी आता तुझ्या आयुष्यातून निघून जात आहे. कारण मीही प्रेमास पात्र आहे—खरं, निर्मळ प्रेम.”*

ती घर सोडून गेली. राजला वाटलं, *हे नाटक आहे, काही दिवसात ती परत येईल.* कारण त्याने आजपर्यंत नेहमीच तिला गृहीत धरलं आपण कसेही वागलो तरी ही आपल्या सोबतच राहील असं त्याला वाटत असे. पण दिवस, महिने झाले, सायली परतली नाही.

आज व्हॅलेंटाईन डे होता. रस्त्यावर प्रेमी युगुलं एकमेकांसोबत आनंदाने फिरत होती, हसत-गप्पा मारत होती. पण राजच्या मनात मात्र एकच विचार—सायली. ती ज्या पद्धतीने त्याच्यासोबत प्रत्येक दिवस साजरा करायची, तिच्या डोळ्यांतील प्रेम, तिच निरागस हास्य, तिची काळजी... आणि त्याने कधीच त्या गोष्टींची कदर केली नाही.

त्याला आठवलं—सायलीने पहिल्या व्हॅलेंटाईन डे ला त्याला प्रेमाने एक पत्र लिहिलं होतं, *”माझ्या आयुष्यात तूच सगळं आहेस.”* आणि एक सुंदर गिफ्ट ही घेतलं होतं. त्याने त्यावर फक्त हसून विषय टाळला होता. त्या क्षणी, त्या पत्राची खरी किंमत त्याला समजली.

तो एकटा बसला होता, हातात एक कप कॉफी आणि डोळ्यांतून नकळत पाणी वाहत होतं. आज त्याला पहिल्यांदा समजलं होतं की आयुष्यात प्रेमाचं स्थान हे सगळ्यात वर असत त्याचं महत्त्व ओळखलं नाही, त्याची जाणीव ठेवली नाही तर ती फक्त पश्चात्तापाची जखम ठरते.

त्या संध्याकाळी तो तिचा जुना फोटो हातात धरून बसला होता. त्याच्या डोळयात अश्रु उभे राहिले, तो स्वतःला जरी कठोर समजत असला तरी सायली गेल्यानंतर त्याला तिचं असणं किती महत्त्वाचं होतं हे समजायला लागलं होतं ,तिचं हसणं तिचा वावर तिच्या प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टी सगळं काही त्याला आठवायला लागलं होतं, पण खूप उशीर झाला होता .आज त्या रिकाम्या घरात तिच्या अस्तित्वाच्या खुणा होत्या पण ती नव्हती.*त्याच्या मनात आले जर वेळ फिरवता आली असती, तर मी तिला रोज प्रेमाने पाहिलं असतं, तिच्या प्रत्येक शब्दाची किंमत केली असती...* पण म्हणतात ना अश्रु कितीही प्रामाणिक असले तरी त्यांच्यात भूतकाळ परत आणण्याची ताकद नसते.. आणि कधी कधी, आयुष्यात आपण कशाला महत्त्व द्यायला हवं होतं हे उशीर झाल्यावरच कळत... जेव्हा ती वेळ परत मिळवता येत नाहीत. राजने ती प्रेमाची संध्याकाळ एकटेच बसून उदास घालवली ...कुठून दूरवरून त्याच्या कानावर सूर येत राहिले ....उसवले धागे कसे कधी ,सैल झाली गाठ... पावलांनाही कळेना का हरवली वाट...

# आई... थांब ना ग तू....

घरातलं वातावरण नेहमीप्रमाणे असतं, पण आईच्या जाण्याचा दिवस जवळ आला की, मनात वेगळाच गोंधळ सुरू होतो. काही दिवसांपूर्वी तिचं घरात येणं म्हणजे आनंदाचा स्फोट असतो. तिच्या हातच्या स्वयंपाकाचा सुगंध, तिच्या खळखळत्या हसण्याचा आवाज, आणि तिने दिलेला मायेचा स्पर्श हे सगळं घराला जिवंत करतं.

पण त्या क्षणांची मोजदाद सुरू झालेली असते. आईचं राहणं तात्पुरतं असल्याचं मनाला माहीत असतं, पण तरीही तिच्या जाण्याची कल्पना मनाला असह्य वाटते. तिच्या जाण्याच्या आदल्या रात्री मन बेचैन होतं.

आई जेव्हा मुलीकडे राहायला येते, तेव्हा घर एकदम जिवंत होतं. रोजच्या गडबडीतही आईची मायेची हाक, तिच्या हातचं जेवण, तिचं गोड हसू, घर भरून जातं. पण हा गोड वेळ कधी निघून जातो, कळतही नाही. आई परत जाण्याचा दिवस जसजसा जवळ येतो, तसतसं मन अधिकच उदास होतं.

त्या दिवशी सकाळीच एक वेगळं वातावरण असतं. आई हळूहळू तिच्या सामानाची बांधाबांध करते, आणि प्रत्येक वस्तू पिशवीत ठेवताना मुलीकडे एक नजर टाकते. त्या नजरेत खूप काही असतं – काळजी, माया, आणि थोडा हिरमोडही. मुलगी मात्र आतून कोसळत असते, पण चेहऱ्यावर कसलाही भाव न दाखवता तिला मदत करत राहते.

जेव्हा स्टेशन किंवा बसस्थानकावर जाण्याची वेळ येते, तेव्हा वाटतं, वेळ थांबून जावा. आईच्या पाठीमागे उभं राहून तिला निरोप देणं इतकं कठीण का वाटतं, हे शब्दांत सांगता येत नाही. तिला ठाम राहायचं असतं, पण आईच्या डोळ्यातलं ओलसरपण पाहून तीही थोडीशी मोडते.

आईची गाडी निघाल्यावर मात्र सगळं रिकामं वाटायला लागतं. घर जरी जागेवर असलं, तरी त्यातलं उबदारपण हरवल्यासारखं वाटतं. प्रत्येक कोपऱ्यात आईच्या आठवणी रेंगाळत असतात – कधी तिच्या हसण्याचा आवाज, तर कधी तिच्या मायेने दिलेली शिकवण. मुलीच्या मनात विचारांची गर्दी होते – **'आईला मी पुरेसं वेळ दिलं का? तिला आनंदी ठेवलं का?'**

आणि मग त्या आठवणींच्या ओघात तिच्या मनाला एकच समाधान मिळतं – आई पुन्हा येईल. ती पुन्हा याच घरात हसेल, तिच्या हातांनी पुन्हा स्वयंपाक करेल, आणि तिचं मायेचं छत्र पुन्हा आपल्यावर असेल. तोपर्यंत ती आठवणींना कवटाळत पुढील भेटीची वाट पाहत राहते.

आईचं असणं म्हणजे सुख, आणि तिचं जाणं म्हणजे एक शून्य. पण त्या शून्यातही तिच्या आठवणींचं विश्व भरलेलं असतं, ती काहीही बोलत नसली, तरी तिच्या नजरेतही तेच भाव असतात.

जाण्याच्या दिवशी सकाळी तिच्या आवराआवरीत मन गुंतून जातं. आईकडून काही बोलून घ्यावं, काही शिकून घ्यावं असं वाटतं, पण पोटात एक गोळा येतो. डोळ्यांच्या कडांवर पाणी दाटतं, आणि मनात एक विचार येतो—"आईला सांगायच अजून खूप काही राहून गेलं!"

जेव्हा तिचं सामान गाडीत ठेवण्याचा क्षण येतो, तेव्हा ती हलकं हसतं, “आता पुन्हा येईन ना?” म्हणते.

आईचा निरोप हा एका वेगळ्या प्रकारचा निरोप असतो. तो तात्पुरता असतो, पण त्या क्षणांची गडद छटा कायम आठवणीत राहते. तिचं जाणं हे एका नवीन भेटीचं आश्वासन असतं, पण तोपर्यंत तिच्या नसण्याची उणीव मनाला सलत राहते. आईच्या असण्याची ओळखच अशी आहे—ती जिथे असते, तिथं आपल *घर* असत.

# आठवणींचा अल्बम

आठवणी या आपल्या जीवनातील एका सुंदर कोपऱ्यात साठवलेल्या खजिन्यासारख्या असतात. त्या वेगवेगळ्या क्षणांचा, लोकांचा, अनुभवांचा आणि भावनांचा एक अल्बम तयार करतात. आठवणींचा हा अल्बम कधी आनंद देतो, तर कधी डोळ्यांत पाणी आणतो, पण त्याचं मोल कधी कमी होत नाही.

लहानपणीच्या खेळण्यांच्या आठवणी, शाळेतील मित्रांबरोबर घालवलेला काळ, कॉलेजच्या सोनेरी दिवसातील वर्ष, कुटुंबासोबत साजऱ्या केलेल्या सणांची गंमत ,कुटुंबात घडणाऱ्या अनेक गमती जमती, प्रत्येक आठवण आपल्याला एका वेगळ्या जगात घेऊन जाते. त्या काळात पुन्हा एकदा डोकावून पाहिलं की हृदय उचंबळून येतं.

आठवणींचा अल्बम हा केवळ सुखद अनुभवांचा संग्रह नसतो, तर त्यात दुःखाचे क्षणही असतात. ज्या लोकांसोबत आपण वेळ घालवला जे लोक एकेकाळी आपले सर्वस्व होते, पण आता ते आपल्या जवळ नाहीत, अशा व्यक्तींच्या आठवणी कधी कधी मनाला हेलावून टाकतात. तरीही या आठवणीच आपल्याला जीवनात पुढे जाण्याची ऊर्जा देतात.

प्रत्येक आठवणीत काहीतरी शिकायला मिळतं. त्या आपल्याला आपल्या चुका समजावून सांगतात आणि आयुष्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन देतात. आठवणी जपायला कॅमेरा लागतोच असं नाही; त्या मनात साठवलेल्या असतात.

कधी शब्दांत, कधी चित्रांत, तर कधी गंधांत  तर कधी एखाद्या गाण्याने ही त्या पुन्हा जिवंत होतात.

आठवणींचा अल्बम म्हणजे आपल्या आयुष्याची एक गोष्ट – रंगीबेरंगी, विविधतेने भरलेली, आणि नेहमीच हृदयाजवळ राहणारी. त्या अल्बमला वेळोवेळी उघडा आणि त्या क्षणांमध्ये पुन्हा हरवून जा. कारण त्या क्षणांमध्येच जीवनाचा खरा अर्थ सापडतो.आधुनिक काळात छायाचित्रं डिजिटल झालीत, पण मनातील आठवणींचा अल्बम मात्र नेहमीच खास राहतो. त्याला ना जुनेपण जाणवतं, ना त्यातील रंग फिके होतात. त्या आठवणी जिवंत ठेवायला आपण फक्त त्या आठवणींच्या प्रत्येक क्षणाला मनापासून जगलं पाहिजे.

आठवणींचा हा अल्बम म्हणजे आपल्या जीवनाचा अनमोल ठेवा आहे, जो आपण कायम आपल्याबरोबर घेऊन फिरतो. त्यात नवी पाने जोडत राहिलो, तर हा अल्बम आयुष्यभर नव्या अर्थाने समृद्ध होत राहतो.

# नसतोस घरी तू जेव्हा ...




रात्रीचे दहा वाजले होते . राधा किचनमध्ये  सगळे काम उरकून, पोरांना झोपवून , खिडकीतून बाहेर पाहत उभी होती .बाहेर रस्त्यावर फारशी गर्दी नव्हती .दिवे लागलेले होते आणि सोसायटीतली वर्दळही कमी झाली होती. ती आतून थकलेली होती, सगळ्यांचा विचार, सगळ्या जबाबदाऱ्या आणि या सगळ्यात ती

स्वतः हरवत चालली होती . तिच्या आवडी निवडी, छंद ,स्वतःसाठी द्यायचा वेळ सगळंच थांबल होत. तिच्या मनात विचारांचे वादळ उठले होते, कारण तिचा जोडीदार बर्याच काळापासून खऱ्या अर्थाने तिच्याजवळ नव्हता .अनेक महिन्यांपासून तिचा नवरा अनिकेत नोकरी, काम, ऑफिस टूर, विविध कोर्सेस या निमित्ताने सतत व्यस्त होता. घर सांभाळायचं ,मुलांना सांभाळायचं ,त्यांच्या शाळा ,क्लास सांभाळायचे, आई-वडील त्यांचे रुटीन याकडे बघायच. घरातली खरेदी ,बिल आर्थिक व्यवहार सांभाळणं सगळ तिच्या अंगावर आलं होतं .तिला समजत होतं अनिकेतला स्वतःचा विकास करायचा आहे, करिअरमध्ये पुढच्या पायरीवर जायचं आहे. त्याच्या अनुपस्थितीत तिच्या खांद्यावर आलेल्या जबाबदारी ची आता तिला सवय होत चालली होती , पण रोजच्या जगण्यातील ताण आणि एकटेपणाने ती खचत चालली होती. बरेचदा तिला कोणाच्यातरी खांद्याची गरज भासायची , पण जोडीदाराची जागा कोणीही घेऊ शकत नव्हतं . आपल्या दोघांमध्ये नात्याची डोर जरा सैल झाली आहे असं सतत वाटायचं तिला.

तिच्या गोष्टी न बोलता समजून घेणारा, तिच्या हसण्यातल दुःख ओळखणारा जोडीदार ती शोधत होती, पण सगळं काही एकटीने निभवाव लागणार होतं. आज मनाची तगमग अगदी टोकाला गेली होती, वातावरणात सुद्धा अचानक झालेला बदल जाणवत होता. दिवसभर रणरणत्या उन्हाने घामाच्या धारा वाहत असताना अचानक थंड हवेची झुळूक अंगाला स्पर्श करून गेली. आपण आपलं मन नेहमीच मारत असतो ,याला जबाबदार आपणच.. म्हणून सगळा रोष स्वतःवर घेत होती.

“ का कळेना दाटते डोळ्यात पाणी ,

मी खरे म्हणजे तशी दुःखात नाही...

तेवढा ओल्या सरींनी घात केला ,

नाही तर माझी तशी तक्रार नाही "

अशी काहीशी अवस्था तिच्या मनाची झाली होती. राधा बऱ्याचदा स्वतःला विचारायची मी सगळं नीट करू शकेल ?सगळ्या जबाबदाऱ्या पेलू शकेल? तिच्या मनात संशयाचे ढग जमायचे. पण तरीही ती रोज सकाळी उठून नवीन दिवसाची सुरुवात करत होती .मुलांचा हसरा चेहरा , समाधान तिला उभ करत होत. माझ्यावर विसंबणारे घर ,नवरा ,मुलं आहेत मी कमकुवत होऊ शकत नाही ,ती स्वतःशीच म्हणत असे. विचारांची तंद्री तुटली तशी तिने घड्याळ बघितलं, काटा आता अकरावर सरकला होता. मुले झोपली होती तेव्हा ती नवऱ्याची वाट बघत स्वतःला एक कप कॉफी घेऊन सोफ्यावर बसली, तेव्हा तिला जाणवलं या एकटेपणात तिने स्वतःच एक नवीन विश्व शोधल आहे .एक अशा स्त्रीच जी एकट्या बळावरही सगळं जग पेलू शकते. जोडीदाराच्या अनुपस्थितीतही ती खचली नाही, तर अधिक मजबूत झाली. ती आता जबाबदारीला घाबरत नव्हती तर तिला समजून, स्वीकारून निभावत होती. ती दिवसेंदिवस शिकत होती की आयुष्यातल्या जबाबदाऱ्या, संघर्ष कधीच संपत नाही , पण त्यांना निभावताना आपण अधिक सशक्त होत जातो...

**लिखनेसे डर नहीं लगता साहब**

**प्रकाशन करनेसे लगता है**

----

असे ज्या लेखकांना वाटते

अशा लेखकांसाठी पुस्तक प्रकाशन योजना

----

घराबाहेर न पडता

कोणालाही मस्का न लावता

ई पुस्तक - एकही पैसा खर्च न करता

छापिल पुस्तक- एक-दोन हजार रुपयांत

अधिक माहितीसाठी लिहा:

**esahity@gmail.com**